शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.

दिनांक : १६ डिसेंबर, २०२१

**सूचना**

**(Post Matric Scholarship for Students with Disabilities 2021-22)**

विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत **दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२** नुसार **दिव्यांगजन** विद्यार्थ्यांकरिता ही योजना राबविण्यात येते.

**किमान पात्रता व अटी :**

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2) अर्जदाराची **अपंगत्वाची टक्केवारी 40% व त्यापुढील** असावी.
3) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
4) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
5) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित **वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.2.50 लाख** इतकी आहे.
6) एका कुटूंबातील फक्त **दोन दिव्यांग अपत्यांनाच** सदर योजनेचा लाभ घेता येईल.
7) विद्यार्थ्याने कोणत्याही **राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतःचे खाते उघडणे** आवश्यक आहे. विद्यार्थ्याला मंजूर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बँक खात्यावरच जमा करण्यात येणार आहे. तसेच हे खाते आधार कार्डशी संलग्न (Link) करणे आवश्यक आहे.
8) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.

**अर्ज करण्याची पध्दत (नवीन मंजूरी / नुतनीकरण) :**

1) इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
2) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.
3) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्ती लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.
4) ऑनलाईन अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे **(फोटो, मागील वर्षाची गुणपत्रिकेची छायांकित प्रत, पालकांचे शासनाच्या सक्षम प्राधिकारी यांचेकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र, फी पावती, बँक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स, राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केलेला अपंगत्वाचा दाखला, बोनाफाईड सर्टिफिकेट, आधार कार्ड, रेशन कार्ड, HSC Leaving Certificate झेरॉक्स)** जोडून महाविद्यालयीन कार्यालयामध्ये पुढील कार्यवाहीसाठी **31/12/2021** पर्यन्त नवीन **शिष्यवृत्तीकरिता (Fresh)** व **नूतनीकरण शिष्यवृत्तीकरिता (Renewal)** सादर करावीत.

**टीप :** विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत श्री. डी.एन्. पवार यांच्याशी संपर्क साधावा.